निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
सोमवार
२३ मार्च २०२६
पाने: ०४ किंमत: २ .००
वर्ष: १६ वे अंक: १७ वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे

संक्षिप्त

## दातृत्वाचा धनी हरपला!

**ज्येष्ठ नेते दत्ता मेघे यांचे निधन; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भावपूर्ण श्रद्धांजली**

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई (प्रतिनिधी)** महाराष्ट्राच्या राजकारणातील एक ऋषितुल्य व्यक्तिमत्व, माजी मंत्री आणि ज्येष्ठ नेते दत्ताजी मेघे यांचे आज निधन झाले. त्यांच्या जाण्याने केवळ विदर्भाचेच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राचे मोठे नुकसान झाले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दातृत्वाचा धनी हरपला अशा शब्दांत आपला शोक व्यक्त केला असून, मेघे यांच्या कार्याचा गौरव केला आहे.



राजकारणाच्या केंद्रस्थानी कायम 'सामान्य माणूस'

मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले की, दत्ताभाऊ मेघे यांनी आपल्या दीर्घ राजकीय प्रवासात कायम सामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवले. सत्तेत असोत वा नसोत, लोकांचे प्रश्न सोडवणे हीच त्यांची प्राथमिकता होती. त्यामुळेच सर्वपक्षीय नेत्यांमध्ये त्यांचा आदर केला जात असे.

शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रातील महतकार्य

दत्ता मेघे यांनी केवळ राजकारण केले नाही, तर समाजउभारणीत मोठे योगदान दिले.

**शिक्षणाचे जाळे:** विदर्भासह राज्यभरात त्यांनी दर्जेदार शैक्षणिक संस्थांचे जाळे निर्माण केले, ज्यामुळे ग्रामीण भागातील हजारो तरुणांना शिक्षणाची दारे खुली झाली.

**आरोग्य सेवा:** गरीब रुग्णांसाठी त्यांनी आपल्या संस्थांच्या माध्यमातून मोफत आणि सवलतीच्या दरात उपचार उपलब्ध करून दिले. त्यांच्यातील 'दाता' हा गुण अनेकांसाठी जीवनदायी ठरला.

**ज्येष्ठांचा आधार:** ज्येष्ठ नागरिकांसाठी त्यांनी राबवलेले विविध उपक्रम हे त्यांच्या सामाजिक जाणीवेचे प्रतीक होते.

पक्षापलीकडचे राजकारण आणि कौटुंबिक ऋणानुबंध

मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, दत्ताभाऊंशी माझे केवळ राजकीय नव्हे तर कौटुंबिक संबंध होते. अनेक कठीण प्रसंगी त्यांनी मला वडिलकीच्या नात्याने मार्गदर्शन केले. त्यांच्या निधनाने माझी वैयक्तिक हानी झाली आहे. वर्धा आणि नागपूरच्या विकासासाठी त्यांनी कधीही पक्षीय भेदाभेद आड येऊ दिला नाही, हे त्यांच्या यशाचे सर्वात मोठे गमक होते.

नव्या पिढीचा मार्गदर्शक हरपला

दत्ता मेघे हे नव्या पिढीतील राजकारण्यांसाठी मार्गदर्शक होते. त्यांच्या निधनामुळे सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रातील एक अनुभवी नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. मेघे कुटुंबियांच्या दुःखात संपूर्ण महाराष्ट्र सहभागी असल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.

एक आदर्श लोकनेता, शिक्षणमहर्षी आणि दातृत्वाचा हिमालय असलेले दत्ताभाऊ मेघे यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

**– देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

## 'सोसायटी अचिव्हर्स'च्या कव्हर पेजवर पंकजा मुंडे झळकल्या!




**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई (प्रतिनिधी)**ज्यांच्या नेतृत्वात धडाडी आहे, ज्यांच्या निर्णयात लोकाभिमुखता आहे आणि ज्यांच्या राजकारणात 'नैतिकता' हाच सर्वोच्च कणा आहे, अशा महाराष्ट्राच्या कॅबिनेट मंत्री पंकजा मुंडे यांच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. सुप्रसिद्ध आंतरराष्ट्रीय इंग्रजी मासिक 'सोसायटी अचिव्हर्स' (Society achievers) ने आपल्या विशेष अंकासाठी पंकजा मुंडे यांची निवड केली असून, त्यांना थेट 'कव्हर पेज'वर स्थान देऊन त्यांच्या नेतृत्वाचा जागतिक स्तरावर गौरव केला आहे.

नैतिक नेतृत्वाला पर्याय नाही! – जागतिक स्तरावर दखल

मॅगझिनने पंकजा मुंडे यांच्या राजकीय प्रवासाचे वर्णन देअर इज नो सबस्टिट्यूट फॉर इथिकल लीडरशीप (नैतिक नेतृत्वाला पर्याय नाही) अशा शब्दांत केले आहे. आजच्या काळात जिथे राजकारण केवळ सत्तेपुरते मर्यादित मानले जाते, तिथे पंकजा मुंडे यांनी मूल्यनिष्ठ आणि नैतिक राजकारणाचा जो वस्तुपाठ घालून दिला आहे, त्याची ही मोठी पोचपावती मानली जात आहे.

**प्रभावी प्रशासन:** पर्यावरण, वातावरणीय बदल आणि पशुसंवर्धन मंत्री म्हणून त्यांनी घेतलेले धाडसी निर्णय.

**लोकाभिमुख नेतृत्व:** तळागाळातील लोकांशी असलेली नाळ आणि जनसेवेचा वसा.

**जागतिक दृष्टिकोन:** पर्यावरणासारख्या जागतिक प्रश्नांवर त्यांनी राज्यात राबवलेले कल्पक उपक्रम.

**स्त्री शक्तीचे प्रतीक:** राजकारणातील एक कणखर महिला नेतृत्व म्हणून त्यांची ओळख.

या विशेष अंकाचे प्रकाशन शनिवारी पंकजा मुंडे यांच्या 'रामटेक' या शासकीय निवासस्थानी उत्साहात पार पडले. मॅगझिनच्या संपादिका अँड्रिया कोस्टबीर आणि अशोक धामणकर यांनी स्वतः भेट देऊन या अंकाचे अनावरण केले. यावेळी पंकजा मुंडे यांची एक विशेष मुलाखत प्रसिद्ध करण्यात आली असून, त्यात त्यांच्या संघर्षापासून ते यशापर्यंतचा सर्व प्रवास अतिशय आकर्षक छायाचित्रांसह मांडण्यात आला आहे.

माझ्या कामाची आणि तत्त्वांची दखल जेव्हा आंतरराष्ट्रीय स्तरावर घेतली जाते, तेव्हा जबाबदारी अधिक वाढते. हा सन्मान माझा नसून माझ्यावर प्रेम करणाऱ्या महाराष्ट्रातील जनतेचा आहे.

**– पंकजा मुंडे, पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री.**

पंकजा मुंडे यांच्या या जागतिक गौरवाुळे त्यांच्या समर्थकांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत आहे. सोशल मीडियावर सध्या 'सोसायटी अचिव्हर्स'च्या कव्हर फोटोचीच चर्चा असून, मुंडे साहेबांचा वारसा सक्षम हातांत आहे, अशा प्रतिक्रिया उमटत आहेत.

# केवळ उपचार केंद्र नव्हे, तर ग्रामीण विकासाचा 'पॉवर हाऊस'! – उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन

**आत्ताच एक्सप्रेस**

**पुणे (प्रतिनिधी)** महात्मा गांधीजींनी स्थापन केलेला निसर्गोपचार आश्रम हा केवळ शारीरिक व्याधी दूर करणारा दवाखाना नाही, तर तो ग्रामीण विकासाचा आणि स्वावलंबनाचा एक तेजस्वी दीपस्तंभ आहे. निसर्गाशी नाते जोडून मानवाला समृद्ध जीवन जगण्याची कला शिकवणारी ही एक जागतिक चळवळ आहे, अशा शब्दांत देशाचे उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन यांनी आश्रमाच्या कार्याचा गौरव केला.उरुळी कांचन येथील निसर्गोपचार आश्रमाच्या ८१ व्या स्थापना दिनानिमित्त आयोजित सोहळ्यात ते मुख्य अतिथी म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर राज्यपाल जिष्णू देव वर्मा, राज्यसभेचे उपसभापती हरिवंश नारायण सिंह, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्यासह अनेक दिग्गज उपस्थित होते.

**गांधीजींचा विचार: निसर्गच श्रेष्ठ उपचारक!**

उपराष्ट्रपतींनी आपल्या भाषणात आधुनिक जीवनशैलीवर कडक प्रहार केला. ते म्हणाले की, आज जग मधुमेह, उच्च रक्तदाब आणि मानसिक तणावाच्या विळख्यात अडकले आहे. अशा वेळी गांधीजींनी १९४६ मध्ये पेरलेला निसर्गोपचाराचा विचारच तारक ठरेल. खरे आरोग्य महागड्या औषधांत नसून साधेपणा आणि निसर्गाशी सुसंवाद साधण्यात आहे. उरुळी कांचनने हा वारसा जपत आज जागतिक स्तरावर आपली ओळख निर्माण केली आहे, असे त्यांनी अभिमानाने नमूद केले.

**'विकसित भारत'साठी 'निरोगी भारत' अनिवार्य!**

भारत आता 'जागतिक वेलनेस पर्यटनाचे' केंद्र बनत असल्याचे सांगताना उपराष्ट्रपतींनी ठामपणे सांगितले की, जोपर्यंत नागरिक निरोगी नसतील, तोपर्यंत 'विकसित भारत २०२७' (किंवा २०४७) चे स्वप्न पूर्ण होऊ शकत नाही. पाश्चात्य वैद्यकशास्त्राच्या मर्यादा स्पष्ट करत त्यांनी भारतीय पारंपरिक उपचार पद्धती, योग आणि आयुष मंत्रालयाच्या कार्याचे तोंडभरून कौतुक केले.

**राज्यपालांचे आवाहन: 'विषमुक्त अन्नाकडे वळा'**

राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी वाढत्या लोकसंख्येसोबतच अन्नाच्या गुणवत्तेवर चिंता व्यक्त केली. आपण अन्नाच्या बाबतीत स्वयंपूर्ण झालो असलो, तरी विषयुक्त अन्नामुळे आजार वाढत आहेत. निसर्गोपचार हाच यावर शाश्वत उपाय आहे. या आश्रमाने आता विद्यापीठांशी जोडून घेऊन कुशल मनुष्यबळ निर्माण करावे, असे आवाहन त्यांनी केले.




ग्रामीण विकासाचा केंद्रबिंदू: उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी गांधीजींच्या 'खेड्याकडे चला' या मंत्राचा पुनरुच्चार केला. हा आश्रम आरोग्य, स्वावलंबन आणि ग्रामीण उन्नतीचा संगम आहे. निसर्गाच्या सानिध्यात प्रत्येक आजार बरा करण्याची ताकद असते, हे या आश्रमाने सिद्ध केले आहे, असे त्या म्हणाल्या.

पुस्तकाचे प्रकाशन: डॉ. नारायण हेगडे लिखित 'आनंदाची रहस्ये' (Secrets of Our Happiness) या पुस्तकाचे उपराष्ट्रपतींच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.आर्थिक तरतूद: राज्यसभेचे उपसभापती हरिवंश नारायण सिंह यांनी केंद्र सरकारच्या 'आयुष' मंत्रालयासाठी असलेल्या ४,४०० कोटींच्या तरतुदीचा उल्लेख करत स्वदेशी उपचार पद्धतीला मिळत असलेल्या बळावर प्रकाश टाकला.

या सोहळ्याला विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, आमदार ज्ञानेश्वर कटके, डॉ. नारायण हेगडे, डॉ. अभिषेक देवीकर, डॉ. भावार्थ देखणे आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

**आरोग्य म्हणजे केवळ रोगाचा अभाव नव्हे, तर ती शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक स्वास्थ्याची अवस्था आहे.**

**– उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन**

## नातं जपलं! भावाच्या निधनानंतर वहिनीशी विवाह; प्रफुल्ल पाटीलने सावरला पोरका झालेला संसार

**आत्ताच एक्सप्रेस**

**किनवट/प्रतिनिधी/** स्वतःच्या वैयक्तिक सुखाचा त्याग करून, आपल्या दिवंगत भावाच्या मुलांचे भविष्य अंधारात जाऊ नये यासाठी एका तरुणाने घेतलेल्या निर्णयाचे सध्या सर्वत्र कौतुक होत आहे. किनवट तालुक्यातील वझरा (बु.) येथील प्रफुल्ल पाटील या अविवाहित तरुणाने आपल्या विधवा वहिनीसोबत विवाह करून माणुसकीचा एक आगळावेगळा वस्तुपाठ घालून दिला आहे.

संकटात सापडलेले कुटुंब

फेब्रुवारी २०२६ मध्ये वझरा येथील अष्टपाल पाटील यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. अष्टपाल हे कुटुंबाचे मुख्य आधारस्तंभ होते. त्यांच्या निधनामुळे पत्नी विजयालक्ष्मी, ८ वर्षांची मुलगी आणि ६ वर्षांचा अंध मुलगा असा परिवार पूर्णपणे निराधार झाला होता. पतीच्या जाण्याने विजयालक्ष्मी यांच्यासमोर मुलांचे संगोपन, शिक्षण आणि उदरनिर्वाहाचा मोठा प्रश्न उभा ठाकला होता.

कुटुंबावर कोसळलेले हे संकट पाहून धाकटा भाऊ प्रफुल्ल पाटील याने केवळ सांत्वन न करता, प्रत्यक्ष कृतीतून आधार देण्याचे ठरवले. प्रफुल्लने आपल्या वहिनीला जीवनसाथी म्हणून स्वीकारण्याचा आणि आपल्या पुतण्या-पुतणीच्या पितृछत्राची जबाबदारी घेण्याचा निर्णय घेतला. प्रफुल्ल व्यवसायाने ऑटोरिक्षा चालक आहे. आर्थिक ओढाताण असतानाही,



त्याने स्वतःच्या स्वतंत्र संसाराचा विचार न करता भावाच्या कुटुंबाला सावरण्याला प्राधान्य दिले.

ही माझी जबाबदारी आणि कर्तव्य

या विवाहाबद्दल बोलताना प्रफुल्ल अत्यंत भावूक झाला होता. तो म्हणाला माझ्या भावाच्या निधनानंतर त्याची मुले अनाथ होऊ नयेत आणि वहिनीला समाजात सन्मानाने जगता यावे, हाच या विवाहामागचा माझा मुख्य उद्देश आहे. ही माझी केवळ जबाबदारी नसून भावाप्रती असलेले माझे कर्तव्य आहे.प्रफुल्लच्या या निस्वार्थी निर्णयाचे वझरा ग्रामस्थांसह संपूर्ण जिल्ह्यातून कौतुक होत आहे. आजच्या काळात जिथे मालमत्तेसाठी नात्यांमध्ये वादाच्या ठिणग्या उडतात, तिथे प्रफुल्लने रक्ताच्या नात्याला आणि माणुसकीला महत्त्व देऊन एक नवा आदर्श समाजासमोर ठेवला आहे.

## अग्रवाल महिला मंडळाच्या प्रश्नमंच स्पर्धेत महिलांच्या ज्ञानाची कसोटी

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सवाच्या निमित्ताने, अग्रवाल दिगंबर जैन महिला मंडळ (सराफा-हडको) तर्फे शनिवारी विशेष धार्मिक व सामान्यज्ञान प्रश्नमंच स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. श्री शांतीनाथ दिगंबर जैन मंदिर, सराफा येथे झालेल्या या स्पर्धेने महिलांच्या बुद्धीची आणि ज्ञानाची कसोटी लावली.



या स्पर्धेत शब्दकोडी, पहेली, 'दिमाग की बत्ती जलाव', आहार, गणित आणि रामायणातील पात्रांवर आधारित रंजक प्रश्न विचारण्यात आले होते. तसेच धर्मक्षेत्रे व राज्यांची ओळख अशा विविध विषयांनी स्पर्धेत रंगत भरली.

कार्यक्रमाची सुरुवात राजश्री शहा यांच्या मंगलाचरणाने झाली. अर्चना साहूजी यांनी सूत्रसंचालन केले, तर राशी साहूजी यांनी आभार मानले. सीमा, नीलम, सुषमा, ज्योती यांच्यासह अनेक सदस्यांनी स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. यावेळी मंदिर विश्वस्त मुकेश साहूजी, सागर साहूजी आणि महिला समितीच्या भारती बागरेचा, सारिका साहूजी यांच्यासह समाजबांधव व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# 'नोकरी नाकारली, पण इतिहास नाही!';

**शासकीय उपेक्षेला 'डबल महाराष्ट्र केसरी'ने दिला धोबीपछाड, मॅटवरून घेतली निवृत्ती!**

**आत्ताच एक्सप्रेस**

**पुणे/प्रतिनिधी/**ज्या हातांना शासकीय नोकरीची गरज होती, त्या हातांना व्यवस्थेने रिकामे ठेवले... पण त्याच हातांनी आज कुस्तीच्या आखाड्यात असा पराक्रम केला की उभ्या महाराष्ट्राने **'हर्षवर्धन सदगीर'** या नावाचा जयघोष केला! पुण्याच्या वाघोलीत पार पडलेल्या ६८ व्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेत नाशिकच्या हर्षवर्धन सदगीरने महेंद्र गायकवाडला ४-३ अशा फरकाने धूळ चारत 'डबल महाराष्ट्र केसरी' होण्याचा बहुमान मिळवला. पण या विजयाचा गुलाल अंगावर असतानाच, हर्षवर्धनने मॅटवरील कुस्तीतून निवृत्ती जाहीर करून क्रीडा जगतात एकच खळबळ उडवून दिली आहे.

**यशाचा 'रुद्रावतार': ७ वा डबल महाराष्ट्र केसरी!**

२०१९ नंतर पुन्हा एकदा आखाड्याचा राजा कोण? या प्रश्नाचे उत्तर हर्षवर्धनने आपल्या ताकदीने दिले आहे. महेंद्र गायकवाडसारख्या तगड्या पैलवानाला चितपट करत हर्षवर्धनने इतिहासाच्या पानात आपले नाव कोरले.

महाराष्ट्राच्या कुस्ती परंपरेतील तो सातवा 'डबल महाराष्ट्र केसरी' ठरला आहे.

ही केवळ एक कुस्ती नव्हती, तर त्याला 'संपल्यात जमा' करणाऱ्या प्रवृत्तींना दिलेले चोख प्रत्युत्तर होते.

**तेव्हा नोकरी हवी होती, आता गरज नाही! – व्यवस्थेवर प्रहार**

विजयानंतर 'एबीपी माझा'शी बोलताना हर्षवर्धनच्या डोळ्यांत विजयाची चमक आणि काळजातील सल दोन्ही स्पष्ट दिसत होते. अत्यंत भावूक पण आक्रमक स्वरात तो म्हणाला:


२०१९ मध्ये जेव्हा मी पहिल्यांदा महाराष्ट्र केसरी झालो, तेव्हा मला शासकीय नोकरीची नितांत गरज होती. मी मंत्र्यांच्या उंबरठ्या झिजवले, नेत्यांना फोटो दाखवले, पण पदरी केवळ उपेक्षा आली. आज माझ्या हिमतीवर मी दुसऱ्यांदा ही गदा जिंकली आहे.

आज मला कोणाच्या नोकरीची गरज उरलेली नाही!

हर्षवर्धनने मांडलेली ही व्यथा केवळ त्याची नसून महाराष्ट्रातील अनेक खेळाडूंच्या संघर्षाचे जळजळीत वास्तव मांडणारी आहे.

**'खलनायक'** ठरवणाऱ्यांना गाडलं; काका पवारांच्या तालमीचा दबदबा

काही काळ हर्षवर्धन कुस्तीतून बाहेर असल्याचे पाहून अनेकांनी त्याला 'निवृत्त' ठरवून टाकले होते.



पैलवान आता संपला, अशा चर्चा करणाऱ्यांना त्याने वाघोलीच्या मातीत चारीमुंड्या चित केले. मला लोकांनी संपल्यात जमा केले होते, पण मी काका पवारांच्या तालमीसाठी आणि माझ्या हिमतीवर पुन्हा उभा राहिलो, असे म्हणत त्याने टीकाकारांचे तोंड कायमचे बंद केले आहे.

मॅटवरील कुस्तीला 'जय महाराष्ट्र'!

विजय मिळवल्यानंतर हर्षवर्धनने घेतलेला निवृत्तीचा निर्णय सर्वांसाठी धक्कादायक होता. मी आज आनंदाने मॅटवरील कुस्तीतून निवृत्ती घेत आहे, असे त्याने जाहीर केले. अंतिम सामन्यात आपल्याच 'लहान भावा'प्रमाणे असलेल्या महेंद्र गायकवाडला पराभूत केल्यानंतर, एका महान खेळाडूने शिखरावर असताना निवृत्ती स्वीकारून आपली खिलाडूवृत्ती जपली आहे.

असा होता अंतिम प्रवास:

**उपांत्य फेरी:** जय पाटीलचा १०-० असा धुव्वा उडवून अंतिम फेरीत धडक.

**अंतिम फेरी:** महेंद्र गायकवाड (ज्याने सिकंदर शेखला हरवले होते) याच्यासोबत अटीतटीची लढत.

**निकाल:** ४-३ अशा फरकाने हर्षवर्धन विजयी.

# मंत्रालयापर्यंत पोहोचलेली 'भोंदूगिरी' आणि सत्तेची कवचकुंडले!

नाशिकच्या भूमीतून उघडकीस आलेले भोंदूबाबा अशोक खरात प्रकरण आता केवळ एका कथित बाबाच्या फसवणुकीपुरते मर्यादित राहिलेले नाही, तर ते राज्याच्या राजकारणातील एक 'टायमिंग बॉम्ब' बनले आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी या प्रकरणात थेट मंत्रालयातील बड्या अधिकाऱ्यांचा आणि मंत्र्यांचा सहभाग असल्याचा जो 'गौप्यस्फोट' केला आहे, त्याने राज्याच्या सत्ताधाऱ्यांच्या गोटात अस्वस्थता निर्माण केली असणे स्वाभाविक आहे. पण प्रश्न असा उरतो की, जेव्हा जेव्हा अशी प्रकरणे बाहेर येतात, तेव्हा ती केवळ आरोप-प्रत्यारोपांच्या चिखलफेकीत का हरवतात?

सत्ताधाऱ्यांचे 'मौन' की 'लपवाछपवी'?

नाना पटोले यांनी उपस्थित केलेला सर्वात गंभीर मुद्दा म्हणजे मागील अधिवेशनात दिलेला तो 'पेनड्राईव्ह'. जर पुरावे आधीच समोर आले होते, तर मुख्यमंत्र्यांनी ते का दडवले? हा प्रश्न आज महाराष्ट्राच्या जनतेच्या मनात आहे. गुन्ह्याची व्याप्ती आणि गांभीर्य लक्षात घेता, कोणाचीही मागणी नसताना अवघ्या तीन दिवसांत 'SIT' (विशेष तपास पथक) स्थापन करणे, ही तत्परता तपासासाठी आहे की गुन्हेगारांना सुरक्षित खिंडार करून देण्यासाठी? हा संशय आता गडद होत आहे.

महिला कार्ड आणि राजकीय सोयीची भूमिका

रुपाली चाकणकर यांना महिला असल्यामुळे टार्गेट केले जात आहे का, हा मुद्दा उपस्थित करून पटोलेंनी राज्य सरकारला कात्रीत पकडले आहे. एकीकडे फोटो आणि व्हिडिओमध्ये देशाचे गृहमंत्री आणि राज्यातील बडे मंत्री दिसत असताना, कारवाईची टांगती तलवार केवळ खालच्या स्तरावरच का? जर खरातचे संबंध मंत्रालयातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांशी असतील, तर हे केवळ 'अंधश्रद्धेचे' जाळे नसून 'सत्ता आणि पैशाचे' मोठे रॅकेट असल्याचे स्पष्ट होते.

नाशिकमध्ये महाकुंभ भरतो, जिथे भक्तीचा ओघ असायला हवा, तिथे अशा भोंदूगिरीच्या घटनांनी महाराष्ट्र बदनाम होत आहे. या पापाचे धनी केवळ तो बाबा नसून त्याला आशिर्वाद देणारे सत्तेचे हात आहेत.

अधिकारी-मंत्री युतीचे 'पाप'

मंत्रालयातील अधिकारी जेव्हा अशा बाबांच्या दरबारात हजेरी लावतात किंवा त्यांच्या कामात मध्यस्थी करतात, तेव्हा प्रशासकीय व्यवस्थेचे कंबरडे मोडते. नाना पटोलेंनी उद्या विधानसभेत जो 'स्थगन प्रस्ताव' आणण्याचे जाहीर केले आहे, तो केवळ एक संसदीय प्रक्रिया नसून सरकारची विश्वासार्हता तपासणारी 'लिटमस टेस्ट' ठरेल.

आजचे ज्वलंत प्रश्न:

मुख्यमंत्र्यांनी पेनड्राईव्हमधील पुराव्यांकडे दुर्लक्ष का केले?

अशोक खरातच्या मंत्रालयातील वावर आणि बड्या अधिकाऱ्यांशी असलेल्या संबंधांची सीबीआय चौकशी होणार का?

'लाडकी बहीण' योजनेच्या काळात एका महिला नेत्याला (चाकणकर) पुढे करून सरकार आपली कातडी वाचवत आहे का?

नाशिकचे हे प्रकरण आता केवळ एका भोंदूबाबाच्या अटकेवर थांबणारे नाही. यात सहभागी असलेले 'पांढरपेशी' चेहरे समोर येणे गरजेचे आहे. जर सत्तेत बसलेले लोकच अशा प्रवृत्तींना खतपाणी घालत असतील, तर राजीनाम्याची मागणी करणे हा विरोधी पक्षाचा अधिकारच नव्हे, तर कर्तव्य ठरते. उद्याचा विधानसभा दिवस राज्याच्या राजकारणात कोणत्या 'मोठ्या माशाचा' बळी घेतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

महाराष्ट्र आता केवळ खुलासे नको, तर ठोस कारवाई मागत आहे!

# जनतेच्या विश्वासाचा आधारवड कोसळला : दत्ता मेघे युगाचा अंत

विदर्भाच्या राजकीय, शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात अढळ ठसा उमटवणारे ज्येष्ठ नेते दत्ता मेघे यांच्या निधनाची बातमी ही केवळ एका व्यक्तीच्या जाण्याची घटना नाही; ती एका युगाच्या अस्ताची वेदनादायी जाणीव करून देणारी आहे. सार्वजनिक जीवनात सातत्याने सक्रिय राहून लोकसभा, राज्यसभा आणि विधान परिषद अशा विविध सभागृहांतून जनतेचा आवाज बुलंद करणाऱ्या या दिग्गज व्यक्तिमत्त्वाच्या जाण्याने विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्राने एक अनुभवी, दूरदृष्टीचा आणि समाजाशी नाळ जपणारा नेता गमावला आहे. दत्ता मेघे यांचे व्यक्तिमत्त्व बहुआयामी होते. संसदीय व्यासपीठावर त्यांनी केवळ प्रश्न उपस्थित केले नाहीत, तर त्या प्रश्नांच्या मुळाशी जाऊन शासनव्यवस्थेला दिशा देण्याचे काम केले. त्यांच्या राजकीय प्रवासाकडे पाहिले, तर तो सत्तेच्या मोहाचा नव्हे, तर समाजकारणाशी नाळ जोडणाऱ्या आणि विकासाला केंद्रस्थानी ठेवणाऱ्या नेतृत्वाचा प्रवास होता.



विकासाच्या असमतोलाने दीर्घकाळ त्रस्त असलेल्या विदर्भासाठी दत्ता मेघे हे केवळ राजकारणी नव्हते, तर ते एक ठाम आवाज होते. शेतीचे प्रश्न, उद्योगधंद्यांची कमतरता, बेरोजगारी आणि पायाभूत सुविधांची उणीव, या सगळ्या समस्यांकडे त्यांनी केवळ आकडेवारी म्हणून पाहिले नाही, तर त्या मागील मानवी वेदना समजून घेतल्या. म्हणूनच त्यांच्या भूमिकेत केवळ राजकीय आक्रमकता नव्हती, तर सामाजिक संवेदनशीलताही होती.

राजकारणात त्यांनी सत्तेच्या गणितांपेक्षा विकासाच्या समीकरणांना प्राधान्य दिले. पक्षीय समीकरणांच्या गुंतागुंतीतही त्यांनी आपली स्वतंत्र ओळख जपली. त्यांची शैली आक्रमक असली, तरी ती केवळ विरोधासाठी नव्हती; ती रचनात्मक टीका आणि पर्यायी विचार मांडण्यासाठी होती. शासनाच्या धोरणांवर टीका करताना त्यांनी ठोस उपायही सुचवले, हे त्यांच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य ठरते. दत्ता मेघे यांच्या कार्याचा सर्वात भक्कम पाया म्हणजे शिक्षण क्षेत्रातील त्यांचे योगदान. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, त्यांच्या स्वप्नांना दिशा मिळावी आणि ते आत्मनिर्भर बनावेत, यासाठी त्यांनी उभारलेल्या शैक्षणिक संस्थांनी हजारो कुटुंबांचे आयुष्य बदलले. शिक्षण हे केवळ रोजगाराचे साधन नसून समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे, या विश्वासातून त्यांनी उभे केलेले कार्य आजही प्रेरणादायी आहे.

आज शिक्षणाचे वाढते व्यापारीकरण चिंताजनक ठरत असताना, दत्ता मेघे यांनी शिक्षणाला सामाजिक बांधिलकीची जोड दिली. त्यांच्या संस्थांमधून घडणारे विद्यार्थी केवळ पदवीधर नाहीत, तर ते समाजाभिमुख नागरिक असतात, हीच त्यांच्या कार्याची खरी पावती आहे. सामाजिक क्षेत्रातही त्यांचे योगदान तितकेच मोलाचे होते. वंचित आणि दुर्बल घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. समाजातील विषमता कमी व्हावी, संधींचे समान वितरण व्हावे, यासाठी त्यांनी कृतीशील भूमिका घेतली. त्यांच्या कार्यात घोषणाबाजीपेक्षा कृतीला अधिक महत्त्व होते आणि हीच बाब त्यांना इतरांपेक्षा वेगळे ठरवते.

आजच्या राजकारणात तात्कालिक फायद्यासाठी भूमिका बदलणारे, समाजाशी तुटलेले आणि केवळ सत्तेसाठी धडपडणारे नेतृत्व वाढताना दिसते. अशा काळात दत्ता मेघे यांसारख्या मूल्यनिष्ठ नेत्यांची उणीव अधिक प्रकर्षाने जाणवते. त्यांनी आपल्या राजकीय आयुष्यातील चढ-उतार स्वीकारले, पराभव पचवले; पण जनतेशी असलेली नाळ कधीही तुटू दिली नाही. हेच त्यांच्या नेतृत्वाचे खरे बळ होते. त्यांच्या निधनाने एक मूलभूत प्रश्न समोर येतो की, आजच्या राजकारणात अशा प्रकारचे नेतृत्व घडवले जात आहे का? समाजाशी जोडलेले, विकासाला प्राधान्य देणारे आणि दीर्घकालीन दृष्टी असलेले नेते निर्माण होणे ही काळाची गरज आहे. निवडणुका जिंकणे हेच नेतृत्वाचे अंतिम मापदंड नसून, समाजावर सकारात्मक आणि दीर्घकालीन परिणाम घडवणे हेच खरे नेतृत्व आहे, हे दत्ता मेघे यांच्या कार्यातून अधोरेखित होते.

त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी सहज भरून निघणारी नाही. मात्र, त्यांच्या कार्याचा वारसा पुढे नेणे हीच खरी जबाबदारी आहे. त्यांच्या विचारांना, कार्यपद्धतीला आणि सामाजिक बांधिलकीला अनुसरून काम केले, तरच त्यांच्या स्मृतीला खरी आदरांजली ठरेल. आज अनेकजण त्यांना शब्दांत श्रद्धांजली अर्पण करत आहेत; परंतु खरी श्रद्धांजली ही कृतीतूनच व्यक्त होते. समाजासाठी काम करण्याची जिद्द, शिक्षणाला दिलेले प्राधान्य आणि विकासासाठी घेतलेली ठाम भूमिका, या मूल्यांचा स्वीकार केला, तरच त्यांच्या कार्याला खरी सलामी दिली जाईल. दत्ता मेघे यांचे आयुष्य हे संघर्ष, समर्पण आणि समाजसेवेचा जिवंत आदर्श आहे. त्यांनी ज्या मूल्यांसाठी आयुष्य झोकून दिले, ती मूल्ये आजही तितकीच महत्त्वाची आहेत. व्यक्ती निघून जातात, पण त्यांचे विचार आणि कार्य अमर राहतात, दत्ता मेघे हे त्यापैकीच एक. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना व भावपूर्ण श्रद्धांजली.

# बदलते हवामान संपूर्ण सृष्टीसाठी चिंताजनक

जगातील भयावह घटना पहाता बदलत्या हवामानावर नियंत्रण ठेवणे काळाची गरज.जगात महाप्रलय,भूकंप, सुनामी,वणवे लागणे,ज्वालामुखीचा उद्रेक,अवकाळी पाऊस,अती उष्णता, अती थंडी,ग्लेशियर वितळणे, समुद्राची पातळी वाढने किंवा येणाऱ्या नैसर्गिक आपदा याची सुचना यावर नियंत्रण कसे ठेवता येईल व येणाऱ्या नैसर्गिक आपदांची माहिती कशी मिळु शकेल याउद्देश २३ मार्च १९५० ला जागतिक हवामान संस्थेची स्थापना करण्यात आली.यापुर्वी १९२२ ला हवामान शास्त्रज्ञ लुइस फ्राय रिचर्डसन यांनी हवामानाच्या अंदाजाचा शोध लावुन हवामान पहाण्याकरीता सांख्यिकी पध्दत शोधून त्यानुसार काही प्रमाणात हवामान अंदाज वर्तविता येऊ लागले व हवामानाबद्दल जागरूकता निर्माण करण्याचे काम केले. हवामान शास्त्रज्ञ लुइस फ्राय रिचर्डसन यांनी लावलेला शोध आज जगाला अत्यंत कारगर आणि गुणकारी सिध्द झाल्याचे आपण पहातो.त्याच अनुषंगाने १९५० ला जागतिक हवामान संस्थेची (डब्लुएमओ) स्थापना करण्यात आली या संस्थेचे मुख्यालय स्वित्झर्लंड येथील जिनेव्हा येथे आहे.यानंतर (डब्लुएमओ) संयुक्त राष्ट्राची (युएन)विषेश संस्था बनली. पहिला जागतिक हवामान दिवस २३ मार्च १९६१ रोजी साजरा करण्यात आला.त्यावेळी ३१ सदस्य देश होते आता या आंतरराष्ट्रीय संघटनेचे १९३ देशांपेक्षा जास्त सदस्य आहेत. पर्यावरणातील वाढते बदल याबद्दल जागरूकता निर्माण करण्याच्या अनुषंगाने या दिवसाला अत्यंत महत्व आहे.

गेल्या २० वर्षात युद्धजन्य परिस्थिती, वाढते औद्योगिकीकरण, परमाणु परिक्षण, शहरीकरण मोठ्या प्रमाणात जंगलतोड इत्यादी अनेक कारणांमुळे हवामानातील बदलाने जगातील पर्यावरणाची चिंता दिवसेंदिवस वाढत आहे.कारण आज जगातिल पर्यावरण अत्यंत धोकादायक व भयावह स्थितीत येवून ठेपले आहे.यामुळे मानव,पशु-पक्षी व संपूर्ण जीवसृष्टीला मोठा धोका निर्माण झाला आहे.आज जगामध्ये वाढते औद्योगिकीकरण, वायुप्रदूषण, जंगलतोड, युद्धजन्य परिस्थिती,वाढती उष्णता, वाढती लोकसंख्या यामुळे हवामानात रोज वेगवेगळे आमुलाग्र बदल होतांना आपण पहातो.जगात महाप्रलय, सुनामी,भुकंप, ज्वालामुखीचा उद्रेक,अती पाऊस,अती थंडी,अती उष्णता, वणवे लागणे, नैसर्गिक आपत्ती अशा अनेक घटना जगात मानवाच्या अतिरेकामुळे दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढत आहे.या येणाऱ्या आपदांची सटीक माहिती हवामान विभाग जगभर देत असते.यामुळे जगातील देश सतर्कता बाळगुन सुरक्षेच्या दृष्टिकोनातून पाऊले उचलतात. त्यामुळे आपण समजू शकतो की हवामान खात्याची भुमिका जगासाठी अत्यंत मोलाची आणि महत्त्वाची आहे. आज अत्याधुनिक युगात उपग्रहांच्या (सेटेलाईटच्या) माध्यमातून हवामानातील बदलांचे संकेत हवामान संस्था जगभरातील संपूर्ण देशांना वेळोवेळी देत असते.

हवामानातील बदलांचे संकेत लोकांमध्ये जागृता निर्माण करण्याचे काम करीत असते.हवामान दिनाचे औचित्य साधून व हवामानातील वाढते बदल व धोका पहाता निसर्गाला संतुलित ठेवणे गरजेचे आहे.याकरीता जगातील संपूर्ण देशांनी हवामानातील मोठ्या प्रमाणात वाढते बदल पहाता आजच्या दिवसाला जास्तीत जास्त वृक्षारोपण करने अत्यंत गरजेचे आहे.यामुळे वाढत्या हवामानातील बदलांवर नियंत्रण ठेवण्यास मोठी मदत होईल. सोबत निसर्ग प्रफुल्लित राहुन संपूर्ण जंगलातील पशु-पक्ष्यांसाठी एक आल्हाददायक वातावरण निर्माण होईल. कारण हवामानाचे संपूर्ण गणित निसर्गावरच अवलंबून आहे.त्यामुळे निसर्ग सुरक्षित रहाला तर हवामान सुध्दा सुरक्षित राहू शकते.याचा फायदा संपूर्ण जगाला व जीवसृष्टीला होईल.जय हिंद!

**-लेखक,रमेश कृष्णराव लांजेवार**
**(स्वतंत्र पत्रकार )**

# भोंदूगिरी, सत्तेची छाया आणि सत्य दडपण्याचा खेळ : अशोक खरात प्रकरणातून उघड होणारे भयावह वास्तव

आजच्या लोकशाही व्यवस्थेत सर्वसामान्य नागरिकांचा शासनावर असलेला विश्वास हा सर्वात मोठा आधारस्तंभ मानला जातो. परंतु जेव्हा सत्ताधारीच त्या विश्वासाला तडा देणाऱ्या घटनांमध्ये गुंतलेले दिसतात, तेव्हा प्रश्न केवळ एका व्यक्तीचा राहत नाही, तर तो संपूर्ण व्यवस्थेच्या प्रामाणिकतेवर उभा ठाकतो. भोंदू अशोक खरात प्रकरणाने सध्या राज्याच्या राजकारणात अशीच खळबळ उडवली आहे. या प्रकरणात अर्धे मंत्रिमंडळ अडकण्याच्या भीतीने ते दडपण्याचा प्रयत्न होत असल्याची चर्चा रंगू लागली आहे आणि हीच बाब अधिक गंभीर आहे. अशोक खरात नावाचा एक तथाकथित गुरु किंवा बाबा आपल्या चमत्कारांच्या, अंधश्रद्धेच्या आणि मानसिक प्रभावाच्या जाळ्यात अनेकांना अडकवत होता, हे आता उघड झाले आहे. मात्र, या भोंदूगिरीमागे केवळ एक व्यक्ती नसून, त्याला मिळालेली राजकीय पाठराखण ही अधिक धक्कादायक आहे. समाजातील काही प्रभावशाली व्यक्ती, अधिकारी आणि राजकीय नेते यांचे त्याच्याशी असलेले संबंध हळूहळू समोर येत आहेत आणि इथेच प्रश्न निर्माण होतो. जर सत्तेतील लोकच अशा भोंदूगिरीला खतपाणी घालत असतील, तर सामान्य माणसाने कोणावर विश्वास ठेवायचा?

या प्रकरणात सर्वात धोकादायक बाब म्हणजे, सत्य बाहेर येऊ नये म्हणून चाललेले प्रयत्न. तपास यंत्रणांवर दबाव, पुरावे दडपण्याचा प्रयत्न, साक्षीदारांना धमकावणे, हे सगळे चित्र लोकशाहीला कलंक लावणारे आहे. जेव्हा अर्धे मंत्रिमंडळ अडकण्याची भीती ही चर्चा पुढे येते, तेव्हा हे स्पष्ट होते की हा केवळ एक गुन्हा नसून, सत्तेच्या उच्च पातळीवर पोहोचलेला भ्रष्टाचाराचा जाळ आहे. वृत्तपत्रांनी नेहमीच जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम केले आहे. त्याच परंपरेत या प्रकरणाकडे पाहिले, तर ही घटना केवळ गुन्हेगारी स्वरूपाची नाही, तर सामाजिक आणि राजकीय अधः पतनाचे प्रतीक आहे. अंधश्रद्धा आणि भोंदूगिरीविरोधात कायदे असतानाही, अशा व्यक्तींना राजकीय आश्रय मिळतो, ही वस्तुस्थिती अत्यंत वेदनादायक आहे. महाराष्ट्र ही संतांची, विचारवंतांची भूमी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांपासून ते शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचारांपर्यंत, या भूमीने नेहमीच विवेक, विज्ञाननिष्ठा आणि सामाजिक न्याय यांचा पुरस्कार केला आहे. मग आज त्याच महाराष्ट्रात भोंदूगिरीला इतकी मोकळीक कशी मिळते? याचे उत्तर शोधताना आपण सत्तेच्या राजकारणाकडे दुर्लक्ष करू शकत नाही.अशोक खरातसारख्या व्यक्तींना फोफावण्यासाठी केवळ लोकांची अंधश्रद्धा कारणीभूत नसते; त्यामागे सत्तेचा आशीर्वाद असतो. जेव्हा मंत्री, आमदार किंवा प्रभावशाली नेते अशा व्यक्तींच्या कार्यक्रमांना हजेरी लावतात, त्यांचे गौरव करतात, तेव्हा समाजात एक चुकीचा संदेश जातो की, ही व्यक्ती खरोखरच प्रभावशाली आहे आणि मग सामान्य माणूसही त्या प्रभावाला बळी पडतो. या प्रकरणात जर खरोखरच मंत्रिमंडळातील काही सदस्य अडकत असतील, तर तपास अधिक पारदर्शक आणि कठोर होणे आवश्यक आहे. पण दुर्दैवाने, सध्या दिसणारी परिस्थिती उलट आहे. प्रकरण दाबण्याचा प्रयत्न होत असल्याच्या चर्चा म्हणजे लोकशाहीसाठी धोक्याची घंटा आहे. कारण, जर सत्ताधारीच स्वतःला वाचवण्यासाठी तपासात हस्तक्षेप करत असतील, तर न्यायव्यवस्थेवरचा विश्वास कोसळतो. यापूर्वीही देशात अनेक घोटाळे, प्रकरणे समोर आली आहेत, जिथे सुरुवातीला सत्य दडपण्याचा प्रयत्न झाला पण शेवटी सत्य बाहेर आलेच. कारण सत्याला कितीही दाबण्याचा प्रयत्न केला, तरी ते कधी ना कधी उघड होतेच. अशोक खरात प्रकरणातही हेच होईल, अशी जनतेची अपेक्षा आहे. मात्र, त्यासाठी समाजाची जागरूकता आणि माध्यमांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

आजच्या डिजिटल युगात माहिती लपवणे इतके सोपे राहिलेले नाही. सोशल मीडिया, स्वतंत्र पत्रकारिता आणि जनतेची सतर्कता यामुळे अनेक गोष्टी उघडकीस येतात पण याचबरोबर खोटी माहिती पसरवण्याचाही धोका असतो. त्यामुळे या प्रकरणात सत्य आणि अफवा यामधील फरक ओळखणे आवश्यक आहे. तरीही, जे प्रश्न उभे राहिले आहेत, त्यांची उत्तरे मिळणे आवश्यक आहे. या प्रकरणातून आणखी एक महत्त्वाचा मुद्दा समोर येतो, तो म्हणजे अंधश्रद्धेविरोधातील लढा. महाराष्ट्रात अंधश्रद्धा निर्मूलनासाठी अनेक वर्षे कार्य झाले आहे पण तरीही अशा भोंदूंचा प्रभाव टिकून आहे, याचा अर्थ अजूनही समाजात जागृतीची गरज आहे. शिक्षण, विज्ञाननिष्ठ विचार आणि सामाजिक जबाबदारी यांचा प्रसार केल्याशिवाय हा प्रश्न सुटणार नाही. राजकीय दृष्टिकोनातून पाहिले, तर हे प्रकरण सत्ताधाऱ्यांसाठी एक मोठी कसोटी आहे. जर त्यांनी पारदर्शक आणि निष्पक्ष तपासाला सहकार्य केले, तर त्यांचा विश्वास टिकू शकतो. पण जर प्रकरण दाबण्याचा प्रयत्न केला, तर जनतेचा रोष अधिक वाढेल. कारण आजचा मतदार जागरूक आहे, प्रश्न विचारतो आणि चुकीच्या गोष्टींना माफ करत नाही.

विरोधकांची भूमिकाही येथे महत्त्वाची ठरते. त्यांनी या प्रकरणाचा केवळ राजकीय फायदा घेण्याऐवजी, सत्य बाहेर येण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. कारण हा प्रश्न केवळ सत्तेचा नाही, तर संपूर्ण व्यवस्थेच्या प्रामाणिकतेचा आहे. शेवटी, या प्रकरणाकडे केवळ एक घोटाळा म्हणून न पाहता, एक मोठा सामाजिक संदेश म्हणून पाहणे गरजेचे आहे. भोंदूगिरी, अंधश्रद्धा आणि सत्तेचा गैरवापर याविरोधात समाजाने एकत्र येणे आवश्यक आहे. कारण जर आपण आज आवाज उठवला नाही, तर उद्या अशा घटना आणखी वाढतील. अशोक खरात प्रकरण हे एक आरसा आहे, जो आपल्याला आपल्या समाजाचे आणि व्यवस्थेचे खरे स्वरूप दाखवत आहे. आता प्रश्न हा आहे की आपण त्या आरशात दिसणाऱ्या वास्तवाला स्वीकारून बदल घडवणार आहोत का, की पुन्हा एकदा डोळेझाक करून पुढे जाणार आहोत? लोकशाहीची खरी ताकद ही जनतेच्या सजगतेत असते आणि आज ती सजगता दाखवण्याची वेळ आली आहे. सत्य दडपण्याचा प्रत्येक प्रयत्न हा लोकशाहीवर आघात असतो. त्यामुळे या प्रकरणात निष्पक्ष, पारदर्शक आणि निर्भीड तपास होणे हीच काळाची गरज आहे.

**-प्रवीण बागडे**
**नागपूर ,मो.क्र.**
**९९२३६२०९१९**

# सुर्य-चंद्र-आकाश-पाताळ आहे,तोपर्यंत भारतमातेच्या भुमिपुत्रांचे नाव अमर राहील

आज शहीदांच्या पुंण्यायीनेच देशाची १४० कोटी जनता खुला स्वास घेत आहे. अनेक क्रांतिकारक,थोर पुरुष यांच्या अथक परिश्रमाने,प्रयत्नाने व बलिदानाने १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. क्रांतिकारकांनी कोणत्याही गोष्टीची व आपल्या परिवाराची पर्वा न करता इंग्रजांना सडेतोड उत्तर देऊन स्वतंत्र भारताची मशाल १९४७ ला प्रज्वलीत केली.१९२८ ला भारतातील घडामोडींचा अभ्यास करण्यासाठी इंग्लंडहून सायमन कमिशन नावाचे शिष्टमंडळ भारतात आले. त्यावेळी सायमन कमिशन नावाचे वादळ रोखण्यासाठी लाला लजपतराय यांनी पुढाकार घेऊन सायमन परत जाच्या घोषणांनी संपूर्ण भारत एकवटला.ही बाब सायमन कमिशनचे अधिकारी सँडर्स यांना पचली नाही.लाला लजपतराय यांच्या नेतृत्वाखाली लाखोंच्या संख्येने प्रदर्शनकारी जमा झाले.यामुळे सायमन कमिशनची घाबरगुंडी उडाली. जमाव पांगवण्यासाठी सँडर्स यांनी लाठीचार्जचा आदेश दिला.

यात लाला लजपतराय घायाळ झाले आणि त्यातच १७ डिसेंबर १९२८ ला त्यांचा अंत झाला.त्यांच्या मृत्यूमुळे संपूर्ण भारतात शोककळा पसरली. हे दु:ख भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांना पाहवले नाही. त्यामुळे क्रांतिकारकांच्या तळपायाची आग मस्तकात गेली आणि लाला लजपतराय यांच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी क्रांतिकारकांनी दृढनिश्चय करून व्युहरचना तयार केली आणि लाला लजपतराय यांच्या मृत्यूला कारणीभूत असणारा इंग्रज अधिकारी सँडर्स याला ठार मारण्याचे ठरविले.

लाला लजपतराय यांच्या पहिल्या मासिक श्राध्दाच्या दिवशी भगतसिंग,राजगुरू आणि सुखदेव हे तिघेही वेष बदलुन सँडर्स यांच्या निवासस्थानी गेले.सँडर्स दिसताच सुखदेव यांनी संकेत दिले. संकेत मिळताच भगतसिंग आणि राजगुरू यांनी एकाचवेळी गोळ्या झाडून सँडर्सला जागीच ठार केले व तेथुन पलायन केले.यामुळे इंग्रज आगबबुला झाले व इंग्रजांनी तिघांना पकडण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले.बरेच दिवस इंग्रजांना हुलकावणी देत तिन्ही क्रांतिकारक भूमिगत राहिले. परंतु फितुरीमुळे ते पकडले गेले. शेवटी २३ मार्च १९३१ ला भारतमातेच्या तिन्ही सुपुत्रांना इंग्रजांनी फाशी दिली. यामुळे संपूर्ण भारत स्तब्ध होऊन सर्वत्र शोककळा पसरली.भारत स्वतंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या या तिन्ही सुपुत्रांना कोन्हीही कधीही विसरणार नाही.जो पर्यंत सुर्य-चंद्र, आकार-पाताळ आहे तोपर्यंत या शहिदांना कोणीही विसरणार नाही. भगतसिंग राजगुरू आणि सुखदेव यांचे बलीदान पाहून १४० कोटी जनतेच्या तळपायाची आग आजही मस्तकात जाते.परंतु ९५ टक्के राजकीय पुढारी शहिदांना विसरल्याचे दिसून येते.कारण ९५ टक्के राजकीय पुढारी आज देशसेवा, सामाजिक सेवा व देशांच्या विकासापेक्षा स्वत:च्या विकासाकडे जास्त लक्ष देताना दिसतात. राजकीय पुढाऱ्यांनो याद राखा जोपर्यंत तुम्ही देशाच्या विकासासाठी, जनतेच्या हितासाठी, गोरगरिबांच्या कल्याणासाठी संपूर्णपणे ताकद लावणार नाही तोपर्यंत शहिदांच्या आत्म्याला शांती मिळणार नाही व त्यांना राजकीय दृष्ट्या खरी श्रद्धांजली म्हणता येणार नाही. क्रांतिकारक,शहिद हसत-हसत फासावर का चढले यामागचा त्यांचा एकच उद्देश होता.तो म्हणजे मातृ भुमिची रक्षा करून सर्वसामान्यांना न्याय मिळावा व भारत स्वतंत्र होवून सुख शांती निर्माण व्हावी आणि देश सुजलाम सुफलाम व्हावा.परंतु आजचा राजकीय पुढारी असा झाला आहे की लोका सांगे ग्याण व स्वत: कोरडे पाषाण यामुळेच या कृषी प्रधान देशात मुठभर राजकीय पुढारी भ्रष्टाचाराच्या मार्गाने करोडपती झाल्याचे दिसून येतात व करोडपती शेतकरी शुन्य झालेला दिसुन येतो. कारण आजचा राजकीय पुढारी पाच वर्षासाठी लोकप्रतिनिधी बनतो खरा परंतु पाच वर्षाच्या काळात करोडपती बनतो ही कसली देश सेवा,कसली देश भक्ती म्हणावी!भारतात अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की श्रीमंत हा दिवसेंदिवस श्रीमंत होत आहे व गरीब, सर्वसामान्य,शेतकरी हा गरीबीच्या खाईत जात आहे.

या संपूर्ण बाबींची जान राजकीय पुढाऱ्यांनी ठेवली पाहिजे व देशसेवा आणि जनसेवा याकडे सर्वांनीच लक्ष केंद्रित केले पाहिजे तेव्हाच राजकीय पुढाऱ्यांची शहीदांना खरी श्रद्धांजली समजल्या जाईल.राजकीय पुढाऱ्यांना कोणत्याही लढाईवर जाण्याची गरज नाही.फक्त शहिदांचे अनुकरण करून लोकप्रतिनिधी,जनप्रतिनिधी या पदाला कलंकित न करता यांचा योग्य उपयोग करून जनसेवा व लोककल्याणाची कामे केली पाहिजे. तेंव्हाच शहिदांना खरी श्रद्धांजली ठरेल व शहिदांच्या आत्म्याला शांती मिळेल. संपुर्ण देश शहिद दिनाला शहिदांना आपली आदरांजली अर्पण करीत आहे.परंतु शहिदांचे बलीदान व्यर्थ जाणार नाही याची जाण मुख्यत्वेकरुन राजकीय पुढाऱ्यांनी ठेवण्याची गरज आहे.राजकीय पुढाऱ्यांनो थोडे ७९ वर्षे मागे वळून पहा व क्रांतिकारकांना देश स्वातंत्र्यासाठी कायकाय यातना भोगाव्या लागल्यात याचे अनुकरण करून चिंतन करा आणि त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून समाजसेवा करण्याची तत्परता दाखवा.कारण राजकीय पुढाऱ्यांचे लक्ष देशसेवेपेक्षा फक्त स्वतःचे हीत साधण्याचा प्रयत्न जास्त असतो.

दिनांक १९ मार्च २०२५ बुधवारला अनेक वर्तमानपत्रात प्रकाशित झालेल्या माहितीनुसार जाहीर केलेल्या एका स्वयंसेवी संस्था असोसिएशन ऑफ डेमोक्रॅटिक रिफॉर्म्सच्या (एडीआर) अहवालात असे दिसून आले की देशातील ४५ टक्के आमदारांवर गुन्हेगारीचे खटले दाखल आहेत ही स्वतंत्र भारतासाठी दु:खद व धक्कादायक बाब आहे.यांना कसले लोकप्रतिनिधी म्हणावेत हाही प्रश्न उपस्थित होतो.त्यामुळे यावर अंकुश लावने अत्यंत गरजेचे आहे.करीता सावधान राजकीय पुढाऱ्यांनो कोणतेही कार्य करतांना शहिदांचे अनुकरण अवश्य करावे व त्यांच्या बलीदानाला कोठेही ठेच किंवा तडा पोहचणार नाही याची दक्षता घ्यावी. शहिद दिनाच्या निमित्ताने देशवासीयांना हेच सांगु इच्छितो की बदलत्या हवामानामुळे व युद्धजन्य परिस्थितीमुळे देशातील वाढते प्रदुषण धोकादायक स्थितीत येवून ठेपले आहे आणि प्रदूषणाच्या बाबतीत जगामध्ये भारताचा तिसरा क्रमांक लागतो.

याकरीता शहिद दिनाचे औचित्य साधून राजकीय पुढारी, सामाजिक संघटना व सर्वसामान्य नागरिकांनी आपल्यापरीने वृक्षारोपण करून जास्तीत जास्त वृक्षलागवड करण्याचा संकल्प केला पाहिजे हीच शहिदांना खरी श्रद्धांजली ठरेल व हे वृक्ष अनंत काळापर्यंत आपल्या स्मरणात राहील आणि शहिदांचे स्मरण आपल्याला प्रत्येक झाडाच्या पानात, फुलात,फळात दिसुन येईल.हे भारत मातेच्या शहिद भुमि पुत्रांनो माझा कोटी कोटी प्रणाम जब तक सुरज चांद रहेंगा तबतक शहिदोंका नाम रहेंगाजय हिंद! जय भारत.

**- लेखक , रमेश कृष्णराव लांजेवार**
**(स्वतंत्र पत्रकार )**

संक्षिप्त




## पैठण एमआयडीसी पोलिसांची मोठी कारवाई;

**५०० किलो गोमांसासह चौघांच्या आवळल्या मुसक्या!**

**आत्ताच एक्सप्रेस**

**पैठण (प्रतिनिधी)** तालुक्यातील बालानगर परिसरात सुरू असलेल्या गोवंश कत्तलखान्यावर एमआयडीसी पोलिसांनी छापा टाकून धडाकेबाज कारवाई केली आहे. या कारवाईत पोलिसांनी ५०० किलो गोमांस, कत्तलीचे साहित्य आणि दोन दुचाकींसह एकूण १ लाख ७० हजार ८५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, चार आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत.

गुप्त माहिती अन् थरारक छापा

मिळालेल्या माहितीनुसार, बालानगर येथील गणी सोडू शेख याच्या शेतातील बाभळीच्या झाडाखाली गोवंशाची अवैध कत्तल करून मांस विक्री केली जात असल्याची गोपनीय माहिती सहायक पोलीस निरीक्षक ईश्वर जगदाळे यांना मिळाली होती. माहितीची खात्री पटताच, पोलिसांनी वेळ न घालवता तात्काळ पथक तयार करून शुक्रवारी (दि. २०) संबंधित ठिकाणी छापा टाकला.

पोलिसांचा ताफा अचानक समोर पाहताच आरोपींची पळापळ झाली, मात्र सतर्क पोलिसांनी घेराव घालून चारही आरोपींना जागीच झडप घालून पकडले.

**जप्त केलेला मुद्देमाल आणि आरोपी**

घटनास्थळावरून पोलिसांनी ५०० किलो मांस, कत्तलीसाठी वापरली जाणारी हत्यारे आणि वाहतुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या दोन मोटार सायकली जप्त केल्या आहेत. याप्रकरणी पोलिसांनी खालील आरोपींना अटक केली आहे.गणी सांडू शेख,महेमूद सत्तार शेख,मुजाहीय गणी शेख,मुस्तकीम गणी शेख **(सर्व राहणारः बालानगर, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर)**

**पोलिस प्रशासनाची मोठी कामगिरी**

ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक विनयकुमार राठोड, अपर पोलीस अधीक्षक अन्नपुणा सिंह, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या पथकात सपोनि ईश्वर जगदाळे, पोउपनि कविता जगताप, दिनेश दाभाडे, करतारसिंग सिंगल, ज्ञानेश्वर भवर आणि अंकुश रहाटवाड यांचा समावेश होता.अवैध धंद्यांविरुद्ध पोलिसांचा असाच कडक पवित्रा यापुढेही कायम राहील, असा इशारा एमआयडीसी पोलिसांनी दिला आहे. या कारवाईमुळे परिसरात अवैध कत्तल करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

## फुलंब्रीत अवकाळीचा तांडव; भाजप आक्रमक!

**तात्काळ पंचनामे करून नुकसानभरपाई देण्याची मागणी**

**आत्ताच एक्सप्रेस**

**फुलंब्री/प्रतिनिधी (सरफराज पटेल)** फुलंब्री तालुक्यात गेल्या दोन दिवसांपासून निसर्गाचा कोप पाहायला मिळाला. अचानक आलेल्या अवकाळी पावसाने काढणीला आलेल्या पिकांचा पार चिखल केला असून, बळीराजा पुन्हा एकदा संकटात सापडला आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेत भारतीय जनता पक्षाने आक्रमक पवित्रा घेतला असून, प्रशासनाने एसी केबिन सोडून बांधावर यावे आणि तातडीने पंचनामे करावेत, अशी मागणी केली आहे.

बळीराजाच्या डोळ्यात पाणी; पिकांचे अतोनात नुकसान

तालुक्यात झालेल्या गारपिटीसह अवकाळी पावसाने गहू, हरभरा आणि फळबागांचे अतोनात नुकसान झाले आहे. हाता तोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. शेतात उभा असलेला गहू आडवा झाला असून, हरभऱ्यालाही मोठा फटका बसला आहे. प्रशासकीय दिरंगाईमुळे जर पंचनामे रखडले, तर शेतकरी अधिक खचून जाईल, अशी भीती व्यक्त होत आहे.

भाजपचे तहसीलदारांना निवेदन: 'आता उशीर नको!'

शेतकऱ्यांच्या या प्रश्नावर भाजप पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी आक्रमक होत २० मार्च रोजी फुलंब्री तहसील कार्यालय गाठले. नायब तहसीलदार संजीव राऊत यांना यावेळी निवेदन देण्यात आले. निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे की, प्रशासनाने पंचनाम्यांचा केवळ 'फार्स' न करता, प्रत्यक्ष बांधावर जाऊन नुकसानीची पाहणी करावी आणि शेतकऱ्यांना योग्य ती आर्थिक मदत मिळवून द्यावी.

शेतकरी आधीच संकटात आहे, त्यात अवकाळीने कंबरडे मोडले आहे. सरकारने आणि प्रशासनाने आता कागदी घोडे न नाचवता थेट मदत पोहचवावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल.

यावेळी प्रशासनावर दबाव निर्माण करण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या हक्कासाठी मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित होते:

सुहास शिरसाठ (भाजपा जिल्हाध्यक्ष),जितेंद्र जैस्वाल (जिल्हा परिषद उपाध्यक्ष),सर्जेराव मेटे (पंचायत समिती सभापती),अश्विनी सोनवणे (पं. स. उपसभापती),गोपाल वाघ, निखिल चव्हाण (जि.प. सदस्य),बाळासाहेब तांदळे, राजू तुपे, योगेश जाधव, मयुर कोलते (पं.स. सदस्य) नायब तहसीलदार संजीव राऊत यांनी निवेदन स्वीकारले असून, परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता संबंधित विभागाला पंचनाम्याचे आदेश दिले जातील, असे आश्वासन दिले आहे. मात्र, आता हे पंचनामे किती वेगाने होतात, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# प्रशासकीय 'लकवा' अन् भाविकांचे हाल!

**वृत्त लिहिपर्यंत खुलताबादमधील वाहतुकीची कोंडी कायम असून, परिस्थिती नियंत्रणाबाहेर आहे. आता तरी वरिष्ठ पोलीस अधिकारी याकडे लक्ष देऊन रस्ता मोकळा करतील का? हाच मोठा प्रश्न आहे.**

**बासी ईदनिमित्त खुलताबादमध्ये जनसागर; वाहतूक नियोजनाचा पुरता बोजवारा**

**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद (प्रतिनिधी)** पवित्र रमजान ईदच्या दुसऱ्या दिवशी साजरी होणाऱ्या 'बासी ईद'निमित्त खुलताबाद येथील प्रसिद्ध दर्गा हजरत जर जरी जर बक्ष यांच्या दर्शनासाठी रविवारी भाविकांचा अलोट जनसागर लोटला. मात्र, या उत्साहावर प्रशासकीय नियोजनाच्या अभावामुळे विरजण पडले आहे. पोलिसांच्या अनुपस्थितीमुळे शहरात वाहतुकीचा प्रचंड खोळंबा झाला असून, प्रशासनाच्या या 'सुस्त' कारभारावर भाविकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

कोंडीचा विळखा; प्रवाशांचा जीव टांगणीला

रविवारची सुट्टी आणि बासी ईदचा मुहूर्त साधत संपूर्ण जिल्ह्यातून हजारो भाविक सकाळपासूनच खुलताबादकडे रवाना झाले. मात्र, शहराच्या मुख्य प्रवेशद्वारावर पोहोचताच भाविकांचे स्वागत झाले ते वाहनांच्या लांबच लांब रांगांनी! दुचाकी, चारचाकी वाहने आणि पायी चालणारे भाविक एकाच वेळी रस्त्यावर आल्याने अवघ्या १० मिनिटांच्या अंतरासाठी प्रवाशांना तासनतास ताटकळत उभे राहावे लागले.

खाकी वर्दी गायब; स्थानिक तरुणांचाच आधार!

सर्वात संतापजनक बाब म्हणजे, वाहतूक व्यवस्था कोलमडलेली असतानाही मुख्य मार्गावर पोलीस प्रशासनाचा पत्ता नव्हता. पोलीस कर्मचारी वेळेवर तैनात नसल्याने वाहतुकीची परिस्थिती हाताबाहेर गेली. अखेर, वाहतूक सुरळीत करण्यासाठी स्थानिक तरुण आणि स्वतः भाविकांनाच रस्त्यावर उतरून धडपड करावी लागली. पोलीस प्रशासन नेमके झोपले आहे की काय? असा संतप्त सवाल उपस्थित भाविकांनी केला आहे.

**नियोजनाचा अभाव:** गर्दीचा अंदाज असतानाही प्रशासनाने पर्यायी मार्गांची किंवा पार्किंगची व्यवस्था केली नाही.

**प्रवाशांचे हाल:** उन्हाचा कडाका आणि वाहतूक कोंडीमुळे लहान मुले व वृद्धांचे प्रचंड हाल झाले.

**संतापाची लाट:** पोलिसांच्या ढिसाळ कारभारामुळे सणाचा आनंद दहशतीत आणि त्रासात बदलल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.



## खुलताबादमध्ये रामनवमीच्या पार्श्वभूमीवर शांतता समितीची बैठक; सामाजिक सलोखा राखण्याचे पोलीस प्रशासनाचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद (प्रतिनिधी)** येत्या २६ मार्च रोजी साजरे होणाऱ्या रामजन्मोत्सव सोहळ्याच्या अनुषंगाने खुलताबाद शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासन सज्ज झाले आहे. या पार्श्वभूमीवर खुलताबाद पोलीस ठाण्याच्या सभागृहात पोलीस निरीक्षक धनंजय फराटे यांच्या मार्गदर्शनाखाली शांतता समितीची महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. उत्सव भक्तीचा, नियम शिस्तीचे असे ब्रीद समोर ठेवत, शहरात सामाजिक सलोखा कायम राखण्यासाठी या बैठकीत विस्तृत चर्चा करण्यात आली.

हुल्लडबाजी खपवून घेणार नाही; पोलिसांचा कडक इशारा

बैठकीला मार्गदर्शन करताना पोलीस निरीक्षक धनंजय फराटे यांनी स्पष्ट केले की, उत्सव साजरा करताना कोणत्याही नियमांचे उल्लंघन खपवून घेतले जाणार नाही. विशेषतः सोशल मीडियावरील अफवांवर विश्वास ठेवू नका आणि कोणताही आक्षेपार्ह मजकूर प्रसारित करू नका, असे आवाहन त्यांनी केले.




उत्सवाच्या काळात हुल्लडबाजी करणाऱ्यांवर पोलीस प्रशासन कडक नजर ठेवून असून, प्रसंगी कठोर कारवाई करण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

प्रशासकीय नियमावलीवर चर्चा

**बैठकीत प्रामुख्याने खालील मुद्द्यांवर मार्गदर्शन करण्यात आले.**

**ध्वनी प्रदूषणः** मिरवणुकीदरम्यान आवाजाच्या मर्यादेचे पालन करणे अनिवार्य आहे.

**मिरवणूक मार्गः** ठरवून दिलेल्या मार्गावरूनच मिरवणूक काढण्याबाबत सूचना देण्यात आल्या.

**सुरक्षा व्यवस्थाः** गर्दीच्या ठिकाणी अनुचित प्रकार टाळण्यासाठी पोलीस बंदोबस्ताचा 'क्शन प्लॅन' तयार करण्यात आला आहे.

या बैठकीचे वैशिष्ट्य म्हणजे सर्व समाजाच्या प्रमुखांनी एकत्र येत प्रशासनाला सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. बैठकीला खुलताबाद नगर परिषदेचे नगराध्यक्ष सय्यद अमेर पटेल, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आबिद जागीरदार, भाजप शहराध्यक्ष परसराम बारगळ, दर्गा कमिटीचे अध्यक्ष शरफोदीन, शहराध्यक्ष मजीद मणियार, माजी उपनगराध्यक्ष सुरेश मरकड, नगरसेवक शेख तौसिफ, मुनिबोदीन, शेख सलीमोद्दीन, तसेच उमेश आवारे, मोहन तुपे, मोहम्मद अन्वर, शेख अमान, दिनेश सावजी, शौकात अली यांच्यासह विविध मंडळांचे कार्यकर्ते व प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

**मजहब वेगळे असले तरी, भावना एकच असू द्या, रामनवमीच्या या उत्सवात, माणुसकीचा गंध असू द्या!.**

– या संदेशाद्वारे शहरात सलोख्याचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न या बैठकीतून करण्यात आला.प्रशासनाने आखून दिलेल्या नियमांचे पालन करून सर्वांनी हा उत्सव आनंदाने साजरा करावा, असे आवाहन शेवटी पोलीस प्रशासनाच्या वतीने करण्यात आले.

## श्रीक्षेत्र वेरूळच्या संत हरिगिरी महाराज संस्थानच्या अध्यक्षपदी ज्ञानेश्वर भालेराव

**नूतन कार्यकारिणीची बिनविरोध निवड!**

**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद (प्रतिनिधी)** जागतिक वारसा स्थळ असलेल्या वेरूळ येथील अत्यंत मानाच्या श्री संत हरिगिरी महाराज संस्थानच्या विश्वस्त मंडळाची निवडणूक रविवारी अत्यंत उत्साहात आणि खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. या निवडणुकीत सर्व संमतीने नूतन कार्यकारिणीची बिनविरोध निवड करण्यात आली असून, अध्यक्षपदी ज्ञानेश्वर जगन्नाथ भालेराव यांची वर्णी लागली आहे.

खुलताबाद तालुक्यातील श्रीक्षेत्र वेरूळ येथे पार पडलेल्या या निवडणूक प्रक्रियेचे संचलन निवडणूक निर्णय अधिकारी तथा ट्रस्टचे सल्लागार किसन साठे यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. गेल्या काही दिवसांपासून या निवडीकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले होते. अखेर सर्वानुमते निर्णय घेत बिनविरोध निवडीची परंपरा कायम राखण्यात आली.

**नूतन कार्यकारिणी पुढीलप्रमाणे:**

अध्यक्ष: ज्ञानेश्वर जगन्नाथ भालेराव,उपाध्यक्ष: शिवाजी भालेराव, सचिव: श्रीकांत भालेराव, सहसचिव: प्रा. अंबादास सगट, कोषाध्यक्ष: रंगनाथ वाघुले, विश्वस्त मंडळ सदस्य कार्यकारिणीमध्ये समाजातील विविध स्तरांतील अनुभवी व्यक्तींचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये हरिदास खरात, किसनराव साठे, कारभारी भालेराव, गजानन पवार, अंकुश साबळे, बाजीराव कांबळे, अनिल आव्हाड आणि गजानन भालेराव यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.निवड प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर नूतन पदाधिकाऱ्यांचा संस्थानच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना नूतन अध्यक्षांनी, संत हरिगिरी महाराज संस्थानच्या माध्यमातून भाविकांसाठी अधिक सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे आणि संस्थानचा सर्वांगीण विकास करणे हाच आमचा मुख्य संकल्प आहे, असे प्रतिपादन केले.या निवडीचे वृत्त समजताच वेरूळ परिसरात आनंदाचे वातावरण पसरले असून, भाविक आणि समाज बांधवांनी नूतन कार्यकारिणीवर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे. या प्रसंगी परिसरातील प्रतिष्ठित नागरिक आणि मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

## फुलंब्री शहरात रमजान ईदचा उत्साह; नगरपंचायतीतर्फे ईदगाह मैदानावर चोख व्यवस्था

**आत्ताच एक्सप्रेस**

**फुलंब्री (प्रतिनिधी)** पवित्र रमजान महिन्याच्या सांगतेनंतर, फुलंब्री शहरात 'ईद-उल-फितर' निमित्त मुस्लिम बांधवांनी मोठ्या जल्लोषात आणि शांततेत नमाज पठण केले.

विशेष म्हणजे, यावर्षी नगरपंचायतीच्या वतीने ईदगाह मैदानावर नमाज पठण करणाऱ्यांसाठी विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या, ज्यामुळे समाजबांधवांमध्ये आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले.

यंदाचा रमजान ठरला खास

यावर्षीचा रमजान महिना अनेक अर्थांनी खास ठरला. महिन्यात एकूण पाच शुक्रवार आले, तसेच ३० रोजे आणि ३० तरावीहची नमाज पूर्ण झाली. दरवर्षी साधारणपणे २९ रोजे होतात, मात्र या वेळी पूर्ण ३० रोजे झाल्याने मुस्लिम बांधवांमध्ये विशेष उत्साह होता. शहरातील अनेक लहान मुलांनीही आपल्या आयुष्यातील पहिला रोजा यावर्षी पूर्ण केला.

नगरपंचायतीतर्फे प्रथमच विशेष सुविधा

फुलंब्री नगरपंचायतीचे नगराध्यक्ष राजेंद्र ठोंबरे आणि उपनगराध्यक्ष जमीर पठाण यांनी पुढाकार घेत ईदगाह मैदानावर विविध व्यवस्था केल्या होत्या. नगरपंचायतीतर्फे अशा प्रकारची व्यवस्था होण्याची ही पहिलीच वेळ होती.

रस्ते दुरुस्ती: शहरातून ईदगाह मैदानापर्यंत जाणाऱ्या रस्त्यावर मुरूम टाकून स्वच्छता करण्यात आली.


पाण्याची सोय: नमाजपूर्वी 'वजू' करण्यासाठी पाण्याचे टँकर आणि बकेटींची व्यवस्था करण्यात आली होती.

**आसन व्यवस्थाः** नमाज पठणासाठी संपूर्ण मैदानावर चटई (जा-नमाज) अंथरण्यात आली होती.

**स्वागत पंडालः** शुभेच्छा देण्यासाठी येणारे राजकीय नेते, पोलीस अधिकारी आणि नागरिकांसाठी भव्य पंडाल व बसण्याची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली होती.

सर्वपक्षीय नेत्यांकडून शुभेच्छांचा वर्षाव

नमाज पूर्ण झाल्यानंतर मुस्लिम बांधवांना शुभेच्छा देण्यासाठी विविध पक्षांचे नेते आणि प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. यामध्ये भाजप



जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाट, जगन्नाथ काळे, अतुल चव्हाण, राजेंद्र पाथ्रीकर, योगेश मिसाळ यांच्यासह पोलीस निरीक्षक संजय सहाने, उपनिरीक्षक सुग्रीव चाटे व अन्य मान्यवरांचा समावेश होता.

ही व्यवस्था यशस्वी करण्यासाठी नगरसेवक जावेद खान पठाण, पवन घोडके, हाजी फेरोज पठाण, आरेफ पटेल, शौकत सय्यद यांच्यासह नगरपंचायतीच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांनी (विजय ताठे व सहकारी) विशेष परिश्रम घेतले.

शहरात दोन वेगवेगळ्या ठिकाणी ईदची नमाज पार पडली. अत्यंत शिस्तबद्ध आणि शांततेच्या वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्याने फुलंब्रीतील हिंदू-मुस्लिम बांधवांच्या सामाजिक सलोख्याचे दर्शन घडवले.


## कन्नड नगरीत माजी नगराध्यक्षांच्या स्मरणार्थ भव्य 'वीणा औषध व क्युप्रेशर' शिबिराचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड (प्रतिनिधी):** कन्नड नगरीचे माजी नगराध्यक्ष कै. शेख अब्दुल वाहेद (शेठ) यांच्या स्मृतीप्रित्यर्थ शहरात भव्य 'नॅचरल प्राकृतिक चिकित्सा' तथा 'वीणा औषध' आणि 'क्युप्रेशर' उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. नवनिर्वाचित नगराध्यक्षा शेख फरीन बेगम, माजी उपनगराध्यक्ष तथा नवनिर्वाचित नगरसेवक शेख जावेद शेठ यांनी या समाजोपयोगी उपक्रमाचे आयोजन केले आहे.

या शिबिराचे उद्घाटन नुकतेच मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले. हे शिबीर रविवार, २२ मार्च ते शुक्रवार, २७ मार्च या सहा दिवसांच्या कालावधीत चालणार आहे. यामध्ये विविध आजारांवर नामांकित व तज्ज्ञ डॉक्टरांकडून केवळ क्युप्रेशर आणि नैसर्गिक पद्धतीने उपचार केले जात आहेत. विशेष म्हणजे, सर्वसामान्य नागरिकांना परवडेल अशा अत्यंत अल्प दरात हे उपचार उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

यापसंगी नगराध्यक्षा शेख फरीन बेगम, अब्दुल जावेद शेठ, माजी उपनगराध्यक्ष डॉ. सदाशिव पाटील, डॉ. विष्णू लांडगे, डॉ.




एस. राजकुमार, डॉ. अनिल सेन, डॉ. प्रेम चौधरी, पत्रकार उदय कुलकर्णी, इरफान सरदार सय्यद, शेख असद, ब्राह्मण सभेचे अध्यक्ष पाडळकर शास्त्री, किरण उर्फ नाना शास्त्री, माजी नगरसेवक असद पवार, राजू




खशालसिंग, संदीप घोगडे, कमिटी राजू, आबेद, अल्ली, असिफ भाई, नबीद राजा, ह्मीउद्दीन पटेल यांच्यासह अनेक मान्यवर आणि उपचारासाठी आलेले नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तालुकावासीयांना लाभ घेण्याचे आवाहन:

विविध व्याधींनी त्रस्त असलेल्या शहर व तालुक्यातील नागरिकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक शेख फरीन बेगम आणि शेख जावेद शेठ यांनी केले आहे. तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या शिबिरामुळे अनेक जुनाट आजारांवर नैसर्गिक उपचार मिळण्यास मदत होणार आहे.

## संक्षिप्त

### १२ वर्षांच्या शाहेदचा दृढनिश्चय!

**कडक उन्हातही पूर्ण केले रमजानचे ३० रोजे आणि तराबी; भोकरदन शहरात कौतुकाचा वर्षाव**

**आत्ताच एक्सप्रेस**

**भोकरदन (प्रतिनिधी)** आजच्या आधुनिक युगात जिथे लहान मुले तंत्रज्ञान आणि मनोरंजनात मग्न असतात, तिथे भोकरदन शहरातील एका १२ वर्षीय मुलाने आपल्या धार्मिक निष्ठेने आणि संयमाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. प्रसिद्ध सायकल व्यापारी शेख फारूक यांचा मुलगा शाहेद शेख फारूक याने २०२६ च्या पवित्र रमजान महिन्यात कडक उन्हाची तमा न बाळगता सलग ३० रोजे पूर्ण केले आहेत.



विशेष म्हणजे, रोजांसोबतच त्याने रात्रीची विशेष 'तराबी' नमाजही पूर्णत्वास नेली असून, त्याच्या या जिद्दीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

यंदा उन्हाळ्याचा पारा चढलेला असताना आणि दिवसाचा कालावधी मोठा असतानाही, शाहेदने आपले रोजे पूर्ण करण्याचा निर्धार ढळू दिला नाही. दिवसभर शाळा आणि अभ्यासाचा व्याप सांभाळत, तहानेने व्याकुळ करणाऱ्या उन्हातही त्याने अत्यंत धैर्याने हे आव्हान पेलले. रमजानमधील उपवास म्हणजे केवळ अन्न-पाणी त्यागणे नव्हे, तर तो संयम आणि शिस्तीचा कस असतो. शाहेदने इतक्या लहान वयात दाखवलेली ही सहनशीलता अनेकांसाठी प्रेरणादायी ठरली आहे.

शाहेदचे वडील शेख फारूक यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, आम्हाला आमच्या मुलाचा खूप अभिमान आहे. आम्ही त्याच्यावर कधीही सक्ती केली नव्हती, त्याने स्वतः च्या इच्छेने आणि जिद्दीने हे रोजे ठेवले आहेत. तर शाहेदने साध्या शब्दात आपली प्रतिक्रिया दिली, मला अल्लाहच्या कृपेने हे शक्य झाले. सुरुवातीला थोडे कठीण वाटले, पण श्रद्धेमुळे मला शक्ती मिळाली आणि मी ३० रोजे पूर्ण करू शकलो.

शाहेदच्या या अतुलनीय कामगिरीची दखल संपूर्ण शहराने घेतली आहे. सोशल मीडियावरही त्याच्या जिद्दीची जोरदार चर्चा सुरू आहे. ज्येष्ठ पत्रकार सय्यद आरेफ, एचडीएफसी बँकेचे सय्यद सोहेल, शेख फेरोज, शेख रउफ, शेख रईस आणि फैसल महेमान यांच्यासह विविध मान्यवरांनी शाहेदचे अभिनंदन केले आहे. अनेक सामाजिक आणि धार्मिक संघटनांनी त्याला सन्मानित करण्याची इच्छा व्यक्त केली असून, त्याच्या उज्ज्वल भवितव्यासाठी प्रार्थना केली आहे.

संयम, श्रद्धा आणि चिकाटीचा नवा आदर्श निर्माण करणाऱ्या शाहेद शेख फारूकने आपल्या कृतीतून हे सिद्ध केले की, मनात जिद्द असेल तर कोणतीही अडचण ध्येयापासून रोखू शकत नाही.

### जालन्यात 'गणगौर'चा उत्साह शिगेला

**राजस्थानहून आलेल्या विलोभनीय मूर्ती ठरतायत आकर्षणाचे केंद्र!**




**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी**/राजस्थानी संस्कृतीचा अनमोल वारसा आणि अखंड सौभाग्याचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या 'गणगौर महोत्सवा'चा उत्साह सध्या जालन्यात ओसंडून वाहत आहे. होळीच्या दुसऱ्या दिवसापासून सुरू झालेल्या या पारंपरिक उत्सवाने आता आपल्या अंतिम टप्प्यात प्रवेश केला असून, शेवटच्या चार दिवसांच्या विशेष सोहळ्याला मोठ्या दिमाखात सुरुवात झाली आहे. यंदा या महोत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे थेट राजस्थानहून साकारून आणलेल्या नवीन आणि कलाकुसरयुक्त मूर्ती!

राजस्थानी कारागिरीचा अनोखा नमुना

'गणगौर महोत्सव समिती, जालना' अंतर्गत साजरा होणारा हा उत्सव यंदा विशेष भव्य ठरत आहे. दरवर्षीप्रमाणे नवीन जालन्यातील दोन प्रमुख ठिकाणांहून गणगौर सजून आल्या आहेत:

अग्रवाल पंचायती वाडा (कादराबाद),गोर चा वाडा (नाथबाबा गल्ली) गोर चा वाडा येथील गणगौरची मूर्ती यंदा थेट राजस्थानच्या निष्णात कारागिरांकडून बनवून आणण्यात आली आहे. या मूर्तीची विलोभनीय कलाकुसर, मोहक रूप आणि पारंपारिक साजशृंगार भाविकांचे डोळे दिपवून टाकत आहे. ही मूर्ती पाहण्यासाठी आणि तिचे दर्शन घेण्यासाठी जालन्यातील नागरिकांची मोठी गर्दी होत आहे.

महोत्सवाचे शेवटचे चार दिवस धार्मिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे मानले जातात. शनिवार, २१ मार्चपासून दोन्ही मानाच्या गणगौर भाविकांच्या दर्शनासाठी खुल्या करण्यात आल्या आहेत. महोत्सवाचे नियोजन खालीलप्रमाणे असेल:

स्थळ: लक्ष्मी नारायण ऑइल मिल, अमित हॉटेल जवळ, जालना.

वेळ: दररोज संध्याकाळी ६:०० ते रात्री १०:०० वाजेपर्यंत.

समाप्ती: मंगळवार, २४ मार्च रोजी या महोत्सवाची सांगता होईल.

संस्कृतीचा अनोखा संगम

या उत्सवादरम्यान पारंपारिक राजस्थानी गाणी, लोकनृत्य आणि विधीवत पूजा अर्चा केली जात आहे. जालन्यात घुमतोय गणगौरचा नाद! अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला आहे. राजस्थानी संस्कृतीच्या या अनोख्या आणि भक्तिमय संगमाचा लाभ जास्तीत जास्त भाविकांनी घ्यावा, असे आवाहन गणगौर महोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

काय: गणगौर महोत्सव २०२६,विशेष: राजस्थानहून आणलेल्या नवीन मूर्ती,कधीपर्यंत: २४ मार्चपर्यंत (सायंकाळी ६ ते १०),कुठे: लक्ष्मी नारायण ऑइल मिल, जालना.

# शहागडमध्ये 'महाराजस्व' शिबिराद्वारे हजारो वंचितांना मिळालं 'शासकीय कवच'!

**अंबड प्रशासनाचा ऐतिहासिक सर्जिकल स्ट्राईक**

**आत्ताच एक्सप्रेस**

**शहागड (जालना)** शासन केवळ कागदावर नाही, तर ते तुमच्या दारात आणि काळजात आहे, याचा प्रत्यय आज अंबड तालुक्यातील शहागडवासीयांनी घेतला. निमित्त होतं महसूल व वन विभाग आणि तालुका प्रशासन अंबड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर'. तहसीलदारांच्या थेट पुढाकारामुळे तब्बल १००० हून अधिक नागरिकांच्या समस्यांचा जागीच निपटारा करण्यात आला, ज्यामुळे प्रशासनाच्या या संवेदनशील कार्याचे कौतुक जिल्ह्याभर होत आहे.

दिव्यांगांचा ११ वर्षांचा संघर्ष संपला!

या शिबिराचे सर्वात मोठे यश म्हणजे २०११ पासून विविध तांत्रिक कारणांमुळे शासकीय लाभापासून वंचित राहिलेल्या बांधवांना मिळालेला न्याय. अपघातात पाय गमावलेले, बोलता न येणारे किंवा हालचाल न करू शकणाऱ्या १५० हून अधिक अतिगरजू दिव्यांग बांधवांना तहसीलदार विजय चव्हाण यांनी स्वतः पुढाकार घेऊन 'संजय गांधी निराधार योजने'चे लाभ मिळवून दिले. अनेक वर्षांपासून कार्यालयाचे उंबरठे झिजवणाऱ्या या वंचितांचे फॉर्म जागीच भरून घेत त्यांना मदतीचे कवच बहाल करण्यात आले.

एकाच छताखाली प्रशासनाचा 'महापूर' शिबिरात केवळ आश्वासनं दिली गेली नाहीत, तर प्रत्यक्ष कामाचा डोंगर उभा करण्यात आला.

**महसूल सेवा:** जात प्रमाणपत्र, उत्पन्न दाखला, फेरफार आणि वारस नोंदींसारख्या १५ हून अधिक सेवांचे तात्काळ वितरण.

**पूरग्रस्तांना दिलासा:** मागील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या पण मदतीपासून वंचित राहिलेल्या लाभार्थ्यांची फेरचौकशी करून त्यांना मदतीची घोषणा करण्यात आली.

**शेतकऱ्यांसाठी 'गिफ्ट':** पात्र लाभार्थ्यांना मोफत रेती पासेस आणि 'मुख्यमंत्री बळीराजा पांदन रस्ता' योजनेतून शेतरस्त्यांच्या कामांना गती देण्याचे आश्वासन.

**महिला सक्षमीकरण:** 'लाडकी बहीण' योजनेतील त्रुटी दूर करून महिलांच्या अर्जांचा निपटारा करण्यात आला.




**प्रशासकीय यंत्रणेची 'फिल्डिंग'**

राज्याचे महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल आणि एसडीओ उमाकांत पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली हे नियोजन करण्यात आले होते. तहसीलदार विजय चव्हाण यांनी सूक्ष्म नियोजन केले, तर नोडल ऑफिसर नम्रता चाटे यांनी अंमलबजावणीसाठी विशेष परिश्रम घेतले. नायब तहसीलदार महेंद्र गिरगे, मंडळ अधिकारी नारायण बामनावत आणि संपूर्ण तलाठी-ग्रामसेवक चमुने दिवसभर राबून या शिबिराला जनआंदोलनाचे स्वरूप दिले.प्रशासन लोकांच्या दारी पोहोचवणे हा केवळ शब्द नाही, तर आमचे कर्तव्य आहे. शहागडमधील हा प्रतिसाद बघून समाधान वाटते की, आम्ही शेवटच्या घटकापर्यंत पोहोचू शकलो.

**- विजय चव्हाण, तहसीलदार, अंबड**

यावेळी आमदार हिकमतदादा उढाण आणि खासदार संजय (बंडू) जाधव यांच्या शुभेच्छांसह विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी आणि सरपंचांनी हजेरी लावली. ग्रामसेवक धोत्रे यांनी वंचितांच्या लाभाबाबत व्यक्त केलेले समाधान या मोहिमेच्या यशाची पावती ठरले.

## जालन्यात गॅसचा तुटवडा: रिक्षाचालक मेटाकुटीला

**दरामध्ये मोठी तफावत आणि लूट!**

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी**/जालना शहरात गेल्या काही दिवसांपासून रिक्षासाठी लागणाऱ्या गॅसचा (Auto LPG/CNG) तीव्र तुटवडा निर्माण झाला असून, रिक्षाचालकांना तासनतास रांगेत उभे राहावे लागत आहे.

शहरात बहुतांश पंपांवरील गॅस संपल्याने चालकांची पाचावर धारण बसली असून, सध्या केवळ दत्त मंदिर समोरील पंपावर गॅस उपलब्ध असल्याने त्या ठिकाणी रिक्षांच्या लांबच लांब रांगा पाहायला मिळत आहेत.




महागाईचा भडका की लूट?

सर्वात धक्कादायक बाब म्हणजे गॅसच्या दरामध्ये झालेली प्रचंड वाढ आणि त्यातील तफावत. काही दिवसांपूर्वी ६० रुपये प्रति किलो दराने मिळणारा गॅस आता सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेला आहे. शहरात ठिकठिकाणी मनमानी दर आकारले जात असल्याचे चित्र आहे:

**काही ठिकाणी दर:** ९५ रुपये प्रति किलो

**काही ठिकाणी दर:** ८४ रुपये ९५ पैसे प्रति किलो

**मूळ दर:** ६० रुपये प्रति किलो (काही दिवसांपूर्वीचा)

एकाच शहरात गॅसच्या दरात १० ते १५ रुपयांची तफावत कशी असू शकते? हा प्रशासकीय ढिसाळपणा आहे की पंप चालकांची मनमानी? असा संतप्त सवाल रिक्षाचालक विचारत आहेत.

**रोजगारावर संकट, कुटुंबाची उपासमार**

रिक्षा हा अनेक कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा एकमेव स्रोत आहे. मात्र, तासनतास रांगेत उभे राहिल्यामुळे रिक्षाचालकांचा कामाचा वेळ वाया जात आहे. त्यातच गॅसचे दर गगनाला भिडल्याने, प्रवाशांकडून जुन्याच दराने भाडे घ्यावे लागत असल्याने रिक्षाचालकांचे आर्थिक गणित कोलमडले आहे.

एकीकडे गॅस मिळत नाही आणि मिळाला तर तो इतक्या महाग दराने घ्यावा लागतोय की खिशात काहीच उरत नाही. प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देऊन दर निश्चित करावेत आणि पुरवठा सुरळीत करावा.

**- एक त्रस्त रिक्षाचालक**

**प्रशासनाचे दुर्लक्ष?**

शहरात गॅसची ही टंचाई कृत्रिम तर नाही ना? असा संशय आता व्यक्त केला जात आहे. वाढीव दराबाबत संबंधित विभागाने अद्याप कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही. जर हीच परिस्थिती राहिली, तर रिक्षाचालकांना उग्र आंदोलन करण्याशिवाय पर्याय उरणार नाही.

## लासूर स्टेशन परिसरात रमजान ईदचा उत्साह; हिंदू-मुस्लिम बांधवांनी जपली एकोप्याची परंपरा

**आत्ताच एक्सप्रेस**

**लासूर स्टेशन (प्रतिनिधी)** गंगापूर तालुक्यातील लासूर स्टेशन परिसरात 'ईद-उल-फित्र' अर्थात रमजान ईदचा सण मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. महिनाभर पवित्र रोजे पाळल्यानंतर सोमवारी सकाळी मुस्लिम बांधवांनी सामूहिक नमाज पठण करून देशात शांतता आणि प्रगतीसाठी प्रार्थना केली. यावेळी हिंदू-मुस्लिम बांधवांच्या गळाभेटीतून सामाजिक सलोख्याचे आणि एकोप्याचे दर्शन घडले.







**नमाज पठण आणि धार्मिक उत्साह**

सोमवारी सकाळी ८:४५ वाजता लासूर स्टेशन येथील मुख्य ईदगाह मैदानावर मौलाना यांच्या नेतृत्वाखाली विशेष नमाज अदा करण्यात आली. चंद्रदर्शन झाल्यानंतर परिसरात आनंदाचे वातावरण पसरले होते.

केवळ लासूर स्टेशनच नव्हे, तर परिसरातील सावंगी, गाजगाव, शिल्लेगाव, शंकरपूर आणि सिरेसायगाव या गावांमध्येही मुस्लिम बांधवांनी मोठ्या उत्साहात नमाज पठण केले.

लहान मुलांपासून थोरांपर्यंत सर्वजण नवीन शुभ्र पेहरावात उपस्थित होते. नमाजानंतर एकमेकांना 'ईद मुबारक' म्हणत शुभेच्छा देण्यात आल्या. घराघरात शिरखुर्मा आणि इतर गोड पदार्थांची मेजवानी देऊन रमजान महिन्याचा समारोप करण्यात आला.

**सामाजिक सलोख्याचे दर्शन**

या सणाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे नमाजानंतर मुस्लिम बांधवांनी उपस्थित असलेल्या हिंदू बांधवांची, राजकीय आणि शासकीय पदाधिकाऱ्यांची गळाभेट घेतली. लासूर स्टेशनच्या या परंपरेने पुन्हा एकदा सर्वधर्मसमभावाचा संदेश दिला.

यावेळी प्रशासकीय अधिकारी आणि राजकीय नेत्यांनी ईदगाह मैदानावर जाऊन मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या. यामध्ये प्रामुख्याने:

**पोलीस प्रशासन:** शिल्लेगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सलीम चाऊस, पोलीस उपनिरीक्षक गणेश काळे, राजेंद्र निसर्ग, हरणे, कीर्ती व इतर कर्मचारी.

**राजकीय व सामाजिक नेतृत्व:** वैजापूर मर्चंट बँकेचे संचालक प्रीतम कुमार मुथा, जिल्हा परिषद सदस्य संदीप आमराव, माजी उपसरपंच गणेश व्यवहारे, उद्योजक संजय पांडव.

**इतर मान्यवर:** कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सुरेश जाधव, नारायण वाकळे, अमोल शिरसाठ, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष अमोल जाधव, एमआयएमचे अजित जाधव, विनोद बागुल यांसह मोठ्या संख्येने हिंदू-मुस्लिम नागरिक उपस्थित होते.

ईदनिमित्त बाजारपेठेतही मोठी गर्दी पाहायला मिळाली. कपडे, मिठाई आणि शिरखुर्मा साहित्याच्या खरेदीसाठी नागरिकांनी सकाळपासूनच गर्दी केली होती. शांतता आणि आनंदाच्या वातावरणात हा सण पार पडल्याने प्रशासनानेही समाधान व्यक्त केले आहे.

## ओबीसी चळवळीचा 'बुलंद आवाज' कायमचा शांत; लढवय्या सेनापती शब्बीर अहमद अन्सारी यांचे दुःखद निधन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी**/महाराष्ट्रातील ओबीसी चळवळीचा आधारस्तंभ, मुस्लिम ओबीसींचे कैवारी आणि प्रशासनाला आपल्या न्याय्य मागण्यांसाठी झुकवणारे ऑल इंडिया मुस्लिम ओबीसी ऑर्गनायझेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष शब्बीर अहमद अन्सारी यांची प्राणज्योत आज मालवली. वयाच्या ७९ व्या वर्षी दीर्घ आजाराशी झुंज देताना जालना येथील राहत्या घरी त्यांची प्राणज्योत शांत झाली. त्यांच्या निधनाने केवळ एका नेत्याचा अंत झाला नाही, तर उपेक्षितांच्या हक्कांसाठी ४५ वर्षे अहोरात्र धडकणारा एक 'ज्वालामुखी' शांत झाला आहे.

४५ वर्षांचा संघर्ष आणि ५२ सरकारी निर्णय (GR)

शब्बीर अहमद अन्सारी यांचे नाव महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहिले जाईल. ज्या काळात ओबीसी आणि विशेषतः मुस्लिम ओबीसींचे प्रश्न ऐरणीवर नव्हते, त्या काळात अन्सारी यांनी या समाजाला संघटित केले. त्यांच्या झुंजार नेतृत्वाचाच हा परिणाम होता की, राज्य सरकारला ओबीसींच्या हितासाठी तब्बल ५२ सरकारी निर्णय (GRs) निर्गमित करावे लागले. शैक्षणिक आरक्षण असो वा सामाजिक न्याय, अन्सारी यांनी प्रत्येक मोर्चावर आपली मुद्रा उमटवली.

**प्रतिकूलतेवर मात करणारा योद्धा**

अत्यंत सामान्य परिस्थितीत जन्मलेल्या अन्सारी यांनी फुले, शाहू, आंबेडकरी विचारांचा वारसा खऱ्या अर्थाने तळागाळातील वंचितांपर्यंत पोहोचवला. घरदार सोडून समाजासाठी मैदानात उतरा, हे त्यांचे अलीकडचे छत्रपती संभाजीनगरमधील आवाहन त्यांच्यातील लढाऊ वृत्तीची साक्ष देते. प्रशासकीय अडथळे आणि राजकीय उदासीनता यावर मात करत त्यांनी ४५ वर्षे आपली निष्ठा ढळू दिली नाही.

**जालन्यात शोककळा: आज रात्री अंत्यसंस्कार**

शब्बीर अहमद अन्सारी यांच्या निधनाची बातमी समजताच संपूर्ण राज्यभरातून शोक व्यक्त केला जात आहे. जालन्यातील रेल्वे गेट, नूतन वसाहत परिसरात जनसागर लोटला आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सहा मुली आणि मोठा परिवार आहे.

**नमाज-ए-जनाजा:** आज रात्री ९:०० वाजता, सय्यद अहमद शेर सवार दर्गा परिसर, जुना जालना.



**दफनविधी:** नमाजानंतर लगतच्या कब्रस्तानमध्ये.

शब्बीर भाईंचे जाणे हा ओबीसी चळवळीचा अपरिमीत तोटा आहे. त्यांनी केवळ संघटना बांधली नाही, तर तरुणांमध्ये लढण्याची जिद्द निर्माण केली. त्यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून निघणार नाही. अल्लाह त्यांना जन्नतमध्ये उच्च स्थान देवो.

**- शेख महेमूद**
**(अध्यक्ष, जालना शहर जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी)**

चळवळीचा वारसा आता तरुणांच्या खांद्यावर

अन्सारी यांनी आपल्या आयुष्याचा प्रत्येक क्षण समाजासाठी वेचला. मंडल आयोगाची अंमलबजावणी असो वा मुस्लिम ओबीसींना मुख्य प्रवाहात आणणे, अन्सारी यांचा शब्द सरकारसाठी आदेश असायचा. त्यांच्या निधनानंतर आता हा ओबीसी चळवळीचा मशाल पुढे नेण्याचे मोठे आव्हान नव्या पिढीसमोर उभे ठाकले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अँण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813